महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२ web:-www.doa.maharashtra.gov.in

क्रमांक - डिओओ/२०२१-२२/चार/३४५ दिनांक :- १०.०२. २०२२.

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिओओ/२०२१-२२/चार/०९, दिनांक १८.०१.२०२२.

## परिपत्रक

शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) २०२१ परीक्षांच्या संभाव्य तारखा उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये घोषित करण्यात आल्या होत्या. अपवादात्मक परिस्थीतीत बदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. असेही सदर परिपत्रकानुसार कळविण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता फक्त इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दिनांक २२ व २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. तसेच एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेबाबत स्वतंत्ररीत्या कला संचालनालयाच्या www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कला संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय/अशासकीय कला महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये मुलभूत / कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेस प्रविष्ठ होता येईल.

ऑनलाईन पध्दतीने इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२१ करिता विद्यार्थ्यांची नाव नोंदणी, परीक्षेचे वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना खालील संकेतस्थळावर दिनांक १२.०२.२०२२ ते २०.०२.२०२२ पर्यंत उपलब्ध असेल.

https://doaonline.in/doadrawinggradeexam/public/login

मुल्यमापन करण्याकरिता कार्यरत कलाशिक्षकांना परीक्षक/समालोचक/उपमुख्य समालोचक याकरिता मुख्याध्यापकांच्या शिफारशीसह अर्ज ऑनलाईन पध्दतीने वरील संकेतस्थळावर दिनांक १४.०२.२०२२ ते २३.०२.२०२२ पर्यंत भरता येईल.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक, (माध्यमिक )महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
४) अध्यक्ष/सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
७) शिक्षणनिरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम.

यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- १) सर्व शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख/मुख्याध्यापक /प्राचार्य/ संबंधित विद्यार्थी व पालक यांचेकरिता.
२) निवड नस्ती.